| | | | |
|---|---|---|---|
| **MHRT060006352024** | दाखल दिनांक | :- | १४.११.२०२४ |
| | नोंदणी दिनांक | :- | १४.११.२०२४ |
| | निकाल दिनांक | :- | ३१.०७.२०२६ |
| | कालावधी | :- | ०१ वर्षे ०७ महिना १७ दिवस |

<u>भाग 'अ'</u>

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**दापोली येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**[श्रीमती पी. एस. वारके, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर]**

**[जाहीर दिनांक ३१/०७/२०२६]**

**<u>निशाणी क्र. ०६ लगत</u>**

| | |
|---|---|
| खटला क्रमांक :- | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २७१/२०२४** |
| गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे:- | **गुन्हा रजि. क्र. १४६/२०२४**<br>**राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, रत्नागिरी** |
| गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे:- | **महाराष्ट्र शासनकरीता**<br>श्री. मानस शंकर पवार<br>जवान, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, रत्नागिरी |
| फिर्यादी :- | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता**<br>**श्री. एस. एस. सावंत** |
| प्रतिनिधीत्व:- | **शैलेश कंदन जाधव**<br>वय ३४ वर्षे,<br>रा. कर्दे, जाधववाडी,<br>ता.दापोली, जि.रत्नागिरी. |
| आरोपी:- | **विधिज्ञ श्री. आर. जे. दाबके** |

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | ०७.०६.२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झालेचा दिनांक | ०७.०६.२०२६ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | १४.११.२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवलेचा दिनांक | ०६.०१.२०२५ |
| पुरावा नोंदविणेस प्रारंभ झालेचा दिनांक | ०३.०४.२०२५ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षीत दिनांक | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ३१.०७.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शैलेश कंदन जाधव** | फौ.प्र.संहितेचे कलम ४१(अ)(१) नुसार आरोपीस नोटीस दिली व त्यामुळे आरोपीस अटक नाही. | लागू नाही. | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | लागु नाही. |

भाग 'क'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )

## साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | पराग पद्माकर नरवणकर | पंच | ०६ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार – नाही.

### क. न्यायालयीन साक्षीदार- नाही.

## सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी - नाही.**

**ब. बचाव- नाही.**

**क. न्यायालयीन निशाण्या- नाही.**

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | सु. २० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १६ लि. गावठी हातभट्टी दारु |
| २. | -- | पाच काचेचे ग्लास |
| | | **(न्यायालयात हजर केलेला नाही.)** |

## न्यायनिर्णय

**(जाहिर दिनांक – ३१/०७/२०२६)**

आरोपीविरुध्द हा खटला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे चालविण्यात आलेला आहे.

**२.** अभिलेखावरील साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे याकामी निशाणी क्र.१ वर आदेश पारित करुन आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

**३.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता उद्भवलले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०७.०६.२०२४ रोजी १३.१५ वा. मौजे कर्दे जाधववाडी येथील घर नं. ८८ च्या मागील मोकळया जागेमध्ये, ता.दापोली, जि.रत्नागिरी येथे आरोपी विनापरवाना व अनाधिकाराने 'सु. २० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १६ लि. गावठी हातभट्टी दारु व पाच काचेचे ग्लास' या वर्णनाचा मुद्देमाल विक्रीच्या उद्देशाने बाळगला व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्ष सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करिता-**

**४.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाकडून आतापर्यंत एक पंच साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र.१ पराग (नि.०६ लगत) या पंच साक्षीदाराने त्याचे सरतपासात दि.०७.०६.२०२४ रोजी तो रस्त्याने जात असताना पोलीसांनी त्याला अडवले व एका कोऱ्या कागदावर सही घेतल्याचे सांगितले. त्याने सही ओळखली आहे. तसेच सदर दिवशी आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टी दारु खेड राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी जप्त केले होते किंवा कसे त्याला माहित नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्याच्यासमक्ष जप्ती पंचनामा झाला असल्याचे नाकारले आहे. सदरहू पंच साक्षीदाराचा अभियोग पक्षाने भारतीय पुरावा कायद्याचे कलम १५४ नुसार सुचक प्रश्न विचारून उलटतपास घेतला परंतू सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. थोडक्यात पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या हकीकतीस दुजोरा दिलेला नाही.

**५.** प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल नि.०८ येथे दाखल केला आहे. सदर अहवालावरून आरोपीच्या ताब्यात मिळून आलेल्या कॅनमध्ये माडीच होती हे सिध्द होत नाही. याकामी अभियोग पक्षाने पुरेशी संधी असून देखील

फिर्यादी, नमुनावाहक तसेच तपासिक अंमलदार यांची साक्ष नोंदविलेली नाही. एकूणच पंच साक्षीदार यांच्या साक्षीवरून सदर कामातील छाप्याविषयी संशय निर्माण होतो. आरोपीच्या ताब्यातून माडी जप्त केल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. सबब, आरोपीने त्याच्याजवळ हातभट्टीची दारु बाळगली हे सिध्द होत नाही. उपरोक्त कारणामुळे मुद्दा क्र.१ बाबत नकारार्थी उत्तर नोंदवित मुद्दा क्र. २ बाबत खालील आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी **शैलेश कंदन जाधव** याला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) खालील गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीनकदबा व बंधपत्र रद्द करण्यात येतो.

३. प्रस्तुत केसमधील जप्त मुद्देमाल म्हणजेच 'सु. २० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १६ लि. गावठी हातभट्टी दारु व पाच काचेचे ग्लास' हा मुद्देमाल नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकरीता मा. जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, रत्नागिरी यांचेकडे अपिल कालावधीनंतर पाठविणेत यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) ची पुर्तता म्हणून रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) चे बंधपत्र व त्याच योग्यतेचा जामीन द्यावा.

(न्यायनिर्णयाचे शब्दांकन व घोषीत खुल्या न्यायालयात केले.)

**सही/-*****
**(श्रीम. पी. एस. वारके)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दापोली,**
**ता. दापोली, जि.रत्नागिरी.**

**दापोली**
**दिनांक- ३१/०७/२०२६**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same words as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | Smt. P. S. Warke<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Dapoli |
| Date of Judgment | : | 31.07.2026 |
| Judgment signed by P.O. on | : | 31.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 31.07.2026 |